**प्रेसनोट** **दि. १३/१०/२०२१**

**<u>श्री.विजयकुमार सहदेव गाडे, वय ५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, शासकिय तंत्रनिकेतन, सोलापूर यांच्यावर रु ४००००/- ची लाच मागणी करुन त्यातील पहिला हप्ता रु २५०००/- लाच मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारलेवरुन गुन्हा दाखल.</u>**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर यूनिट, पुणे परिक्षेत्र |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | जेलरोड पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | श्री.विजयकुमार सहदेव गाडे, वय ५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, शासकिय तंत्रनिकेतन, सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रु ४००००/- लाचेची मागणी करुन त्यातील पहिला हप्ता रु २५०००/- रु लाच मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | पहिला हप्ता रु २५०००/- |
| **थोडक्यात माहिती** | पडताळणी दि १३/१०/२०२१<br>सापळा दि १३/१०/२०२१<br><br>यातील तक्रारदार हे शासकिय तंत्रनिकेतन सोलापूर येथे ग्रंथपाल म्हणुन नेमणुकीस होते व ते दि ३१/०५/२०१९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवत्त झाले आहेत. तक्रारदार यांना सेवानिवत्तीनंतर ग्रॅज्युईटी च्या रक्कमा प्राप्त झाले असुन जीआयएस च्या रक्कमा मिळणे प्रलंबित होते. सदर प्रकरणी तक्रारदार यांनी शासकिय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे रितसर विनंती अर्ज केला होता व त्यांचे जीआयएस च्या रक्कमा अदा होणेचे अनुषंगाने कार्यालयात नेमणुकीस असलेले लिपीक यातील आलोसे गाडे यांची भेट घेवुन पाठपुरावा करत होते. परिणामी यातील आलोसे गाडे यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित जीआयएस च्या रक्कमा तक्रारदार यांना अदा होणेचे अनुषंगाने जीआयएस च्या रक्कमाचे बिल तयार करणे, त्यास ट्रेझरी येथे पाठविणे व त्यानंतर सदर रक्कम त्यांचे बँक खात्यावर पाठविण्याचे कामाकरीता तसेच यापुर्वी केलेल्या कामाचे बक्षिस असे मिळुन तक्रारदार यांचेकडे रु ४००००/- ची लाचेची मागणी करत होते.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पडताळणी व सापळा कारवाई केली असता आलोसे गाडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे सेवानिवत्तीनंतर मिळालेल्या ग्रॅज्युईटीच्या रक्कमांचे केले कामाचे बक्षिस तसेच जीआयएस च्या बिलासंदर्भात काम करण्यासाठीचे मिळुन रु ४००००/- लाचेची मागणी करुन त्यातील पहिला हप्ता रु २५०००/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता यातील आलोसे श्री.विजयकुमार सहदेव गाडे, वय ५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, शासकिय तंत्रनिकेतन, सोलापूर यांना सोलापूर येथील अशोक चौकापासुन संत तुकाराम चौक कडे जाणारे मुख्य रस्त्यालगत असलेल्या दि लक्ष्मी को ऑप बँक सोलापूर च्या विरुध्द बाजुस असलेल्या पुनम टी हाऊस सोलापूर चे समोर रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यातील आरोपी लोकसेवक यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे<br>श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, |
| **सापळा पथक** | श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक,लाप्रवि,सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पोह चंगरपल्लु, मपोना स्वामी, पोना घुगे, पोशि जानराव, पोशि सण्णके, चापोशि सुरवसे सर्व ने. ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ -** www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल -** www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप –** acbmaharashtra.net

**टोल फ्री क्रमांक-** १०६४

**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक –** ९९३०९९७७००

सहा. पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक सोलापूर.

१३/१०

(संजीव पाटील)

**पोलीस उपअधीक्षक**

**ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर**